# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली

## कंत्राटी पद्धतीने चौकशी अधिकारी नियुक्तीबाबत अर्जाचा नमूना

| | | |
|---|---|---|
| १. अर्जदाराचे नाव | :- | ---------------------------------------------- |
| २. संपुर्ण पत्ता | :- | ---------------------------------------------- <br> ---------------------------------------------- <br> ---------------------------------------------- |
| ३. जन्मतारीख (सोबत पुरावा जोडावा.) व अर्जाचे दिनांकास वय | :- | / /१९ वय :- ---------- |
| ४. शैक्षणिक अहर्ता | :- | ---------------------------------------------- |
| ५. उमेदवार शारिरीक, मानसिक आरोग्याच्यादृष्टिने सक्षम आहे काय ? **जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र जोडावे.** | :- | ---------------------------------------------- |
| ६. मोबाईल क्रमांक | :- | ---------------------------------------------- |
| Whatsup App. मोबाई क्रमांक | :- | ---------------------------------------------- |
| ई-मेल आयडी | :- | ---------------------------------------------- |
| ७. सेवानिवृत्त होतांना धारण केलेले पद / कार्यालय/विभाग व वेतनश्रेणी | :- | ---------------------------------------------- <br> ---------------------------------------------- |
| ८. वर्ग-१ संवर्गात सेवा दिलेल्या पदांचे नांव व कालावधी | :- | ---------------------------------------------- <br> ---------------------------------------------- |
| ९. सेवानिवृत्त होतांना अथवा झाल्यावर विभागीय चौकशी अथवा न्यायीक कार्यवाही प्रलंबित आहे काय ? (ज्या विभागातून सेवानिवृत्त झालेत त्या विभागाचे तसे प्रमाणपत्र सोबत जोडावे) | :- | ---------------------------------------------- <br> ---------------------------------------------- |

ठिकाण :-

अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :-

**महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसपीओ-२८०४/प्र.क्र.११/२००४/११-अ, दिनांक २६ मे, २००६, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसपीओ-२८०७/प्र.क्र.२१/०७/११-अ, दिनांक २८ आक्टोंबर, २००९, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकःसंकीर्ण-१०१४/प्र.क्र.५५/११-अ, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ व मा.विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्रमांक सआ/विचौ/स्टेनो/कावि-८५१/२०१४, दिनांक १७.१०.२०१४ मधील निर्देशानूसार जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत गट-क व गट-ड च्या कर्मचाऱ्यांचा विभागीय चौकशीची प्रकरणात चौकशी करण्याकरीता कंत्राटी पद्धतीने चौकशी अधिकारी नियुक्तीसंदर्भात अटी व शर्ती.**

---

१) पॅनलवर नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्याचे वय त्या वर्षाच्या दिनांक १ जुलै रोजी ७० वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) चौकशी अधिकारी हा शारिरिक, मानसिक आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा.

३) चौकशी अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल. अशा कोणत्याही व्यावसायिक कामात किंवा सेवेत चौकशी अधिकारी गुंतलेला नसावा.

४) कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी अधिकाऱ्यांकडे विभागीय चौकशीची प्रकरणे देताना समान प्रमाणात विभागून देण्यात येईल. तथापी एखादे प्रकरण कोणास द्यावे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार अंतिम राहतील.

५) विभागीय चौकशीची प्रकरणे केस टू केस या तत्वावर एका चौकशी अधिकाऱ्याकडे कमाल ६ प्रकरणे सोपविण्यात येईल.

६) चौकशी अधिकाऱ्याने चौकशी प्रकरणासंदर्भात त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती/आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळावी आणि त्याचा वापर केवळ त्यांना सोपविण्यात आलेल्या प्रकरणाच्या चौकशीसाठीच करावा.चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे कामकाज चालू असतांना किंवा चौकशी अहवाल सादर केल्यानतर अशी कोणतीही कागदपत्रे/ माहिती किंवा आधार सामुग्री उघड करता कामा नये. चौकशी अधिकाऱ्याने त्यांना सोपविलेल्या चौकशी प्रकरणाच्या सर्व नोंदी / कागदपत्रे / कामकाज इ. बाबत गुप्तता व गोपनियता बाळगावी. चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर करतांना त्या प्रकरणाच्या सर्व नोंदी, अहवाल इत्यादी त्यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमणाऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सोपवावीत.

७) गट-क व गट-ड च्या अपचाऱ्याच्या चौकशी प्रकरणी चौकशी अधिकारी यांना परिश्रमिकापोटी रुपये १२,०००/- (रुपये बारा हजार फक्त) एवढी ठोक रक्कम मंजूर करण्यात येईल. एकापेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचाऱ्यामागे रुपये १५००/- (रुपये एक हजार पाचशे फक्त) इतके वाढीव मानधन मुळ मानधनाच्या रकमेत (रुपये १२,०००/-) वाढवून देण्यात येईल. मात्र सदर वाढीव मानधनाची कमाल मर्यादा रुपये २४,०००/-इतकी राहिल.

८) वरील परिश्रमिकाव्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिकाऱ्याने स्वतः नियुक्त केलेल्या लिपीक व लघुटंकलेखक यांच्या सेवेपोटी रुपये २,०००/- (रुपये दोन हजार फक्त) एवढी अतिरिक्त ठोक रक्कम मंजूर केल्या जाईल.

९) चौकशीचे कामकाज विभागाच्या / कार्यालयाच्या मुख्यालयात किंवा प्रभारी अधिकाऱ्याच्या, साक्षीदार असलेल्या ठिकाणीच पार पाडण्यात यावे.

१०) जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत सोपविण्यात येणाऱ्या प्रकरणे हे कार्यालयाच्या आवारातच चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडे सोपविलेल्या चौकशीचे काम पार पाडावे लागेल.

११) नियुक्ती प्राधिकाऱ्यास कामकाजाच्या कोणत्याही वेळी, कोणतेही कारण न देता आणि कोणतीही नोटीस न देता, चौकशी अधिकारी यांची सेवा समाप्त करता येईल.

१२) चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या कालावधीत चौकशीचे कामकाज पूर्ण करुन त्यांनी चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा तीन महिण्यापेक्षा उशिरा झाल्यास, विलंब झाल्याचे कारण मीमांसा करण्यात येईल. आपले खुलासा असमाधानकारक असल्यास प्रति महिना रु.१०००/- (अक्षरी एक हजार रुपये फक्त.) प्रमाणे चौकशी अधिकारी यांचे मानधनातुन कपात करण्यात येईल.

१३) करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे पॅनेलमध्ये निवड करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

१४) सदर नियुक्ती ही करार तत्वावर असल्याने सदर पदावर कायमस्वरुपी कोणताही हक्क प्रस्तापित करता येणार नाही.

१५) नियुक्ती करण्यात आलेल्या चौकशी अधिकारी यांना गडचिरोली मुख्यालयात सेवा द्यावी लागेल.

१६) वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

(कुमार आर्शिवाद, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, गडचिरोली

(फरेंद्र आर कुतिरकर)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, गडचिरोली